# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### नागपूर जिल्हापरिषदेच्या डिजिटल शाळांचा विद्युत पुरवठा सुरळीत करणेबाबत

**(१) ३३९ (११-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हापरिषदेच्या शाळातील डिजिटल उपकरणे अनुदानात घट झाल्याने धुळखात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानात घट झाल्याने जिल्हापरिषद शेकडो शाळांची वीज जोडणी कापल्याने शाळेतील डिजिटल उपकरणे निकामी झाली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९७५ शिक्षण विषयक तरतुदी मध्ये विज देयके ग्रामपंचायती कडुन जिल्हापरिषदेच्या शाळेची विज देयके भरली जावी अशी मागणी शासनाकडे करण्यात आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, डिजिटल शाळांना तात्काळ विद्युत पुरवठा जोडणी होणे करीता तसेच केंद्र शासनाच्या अंतर्गत समग्र शिक्षा अभियान विभागास अनुदान वाढ होणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) खरे नाही.

नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत येणा-या अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजिटल उपकरणे लावण्यात आलेली आहेत. समग्र शिक्षा अंतर्गत ५३ शाळांना प्रत्येकी ३ एलईडी उपकरणे देण्यात आलेली आहेत. तसेच लोकसहभागातून व १४ वा वित्त आयोग, ग्रामपंचायतीच्या सहकार्याने प्रोजेक्टर व एलईडी प्राप्त झालेले आहेत. या शाळांमध्ये सर्व डिजिटल साहित्य सुरु आहे.

(२) खरे नाही.

ज्या शाळांची वीज जोडणी कापण्यात आलेली होती त्या शाळांना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात समग्र शिक्षा अंतर्गत प्राप्त झालेल्या शाळा अनुदानातून वीज पुरवठा सुरळीत केला आहे. नागपूर जिल्हा परिषदेच्या वतीने अशा डिजिटल शाळांना कायमस्वरुपी वीज पुरवठा उपलब्ध होण्यासाठी एकूण २८७ शाळांना सोलर पॅनल बसविण्याकरीता प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, नागपूर यांचेकडून मंजूर झाला असून, रु.४.२८ लक्ष महाऊर्जा कार्यालयाकडे वर्ग झालेले आहेत.

सोलर पॅनलद्वारे वीज पुरवठा मिळण्याकरीता महाऊर्जा, नागपूर कार्यालयाकडून कार्यवाही सुरु असून सोलर पॅनल लावण्यात येत आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

डिजिटल उपकरणे असलेल्या शाळांना व वीज जोडणी कापलेल्या शाळांना ग्रामपंचायतीकडून, "जिल्हा परिषदेच्या शाळांची वीज देयके भरली जावी" याकरीता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९७५ नुसार सर्व गट विकास अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्रान्वये ग्रामपंचायतींनी शाळांची वीज देयके भरावीत असे आदेशित केले आहे.

(४) राज्यात वीज पुरवठा नसलेल्या शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ५२०९ शाळांमध्ये वीज पुरवठा उपलब्ध करण्याकरीता तसेच ९२७९ शाळांमध्ये उपलब्ध असलेली विद्युतीकरण सुविधा कार्यान्वित करण्याकरीता शालेय शिक्षण

विभागाकडून संबंधित विभागांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे. समग्र शिक्षा अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०१९-२० मध्ये राज्यातील शाळांकरीता सोलर यंत्रणेद्वारे विद्युतीकरण सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत रु.२५६२५.०० लक्ष निधीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली असता केंद्र शासनाने मागणी अमान्य केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुदत संपलेल्या १५७० ग्रामपंचायतीना मुदतवाढ देण्याबाबत

**(२) १३६९७ (११-०९-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात करोनाचा वाढता प्रादुर्भाव, पाणीटंचाई, चौदावा वित्त आयोग, जनसुविधा सोबतच अत्यावश्यक कामे प्रलंबीत असताना ज्या ग्रामपंचायतींची मुदत माहे एप्रिल, मे, २०२० मध्ये संपली अशा राज्यातील १५७० ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त करण्यात आल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन आदेशाप्रमाणे संबंधीत ग्रामपंचायती व्हीआर प्रशासक नियुक्त करण्यात आले असून एकाच विस्तार अधिकाऱ्यांकडे आठ ते दहा गावांचा कार्यभार असून आगामी काळात करोनाच्या काळात प्रत्येक जिल्हास्तरावरून ये-जा करणाऱ्या प्रशासकीय अधिकारी ग्रामस्थांना मदत करण्याची जबाबदारी कशी पार पाडणार असे अनेक प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,अशा आपत्तीच्या काळात राज्यातील सरपंचांना मुदतवाढ देण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधी, सरपंच , विविध सरपंच संघटनांकडून, ग्रामस्थांकडून मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

जागतिक कोरोना महामारीमुळे साथ रोग अधिनियम १८९७ चा अंमल सुरु झाला असल्याने राज्य निवडणूक आयोगाने प्रस्तावित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा कार्यक्रम पुढे ढकलला. सबब महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १५१ मधील पोट कलम १ खंड (क) मध्ये सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०, दिनांक २५ जून, २०२० अन्वये नैसर्गिक आपत्ती किंवा आणिबाणी किंवा युध्द किंवा वित्तीय आणिबाणी किंवा प्रशासकिय अडचणी किंवा महामारी यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार पंचायतींच्या निवडणूका घेणे शक्य झाले नसेल तर राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा पंचायतींचा प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे.

जागतिक महामारी कोरोनाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०२० व दिनांक १४ जुलै, २०२० नुसार प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## नांदुरा (ता. निमगाव, जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र त्वरीत उभारण्याबाबत

**(३) ३५१०६ (०७-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (ता. निमगाव, जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी लागणारी गट क्रमांक ९७६ मधील दोन हेक्टर जमीन देण्याबाबतचा ठराव ग्रामपंचायतीने दिनांक २० ऑक्टोबर २०१८ रोजी वा त्यासुमारास तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे सादर करून देखील काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मलकापूर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी इमारत बांधकाम त्वरीत करण्याबाबत दिनांक ४/१२/२०२० रोजी वा त्यासुमारास संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, नांदुरा (ता.निमगाव,जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यासाठी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जागा मिळण्यास विलंब झाल्याबाबत शासनाकडून चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) नांदुरा (ता. निमगाव, जि. बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी लागणाऱ्या गट क्रमांक ९७६ मधील दोन हेक्टर जमीनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे नावे हस्तांतरण होणेसाठी रु.७.०० लक्ष इतके शुल्क लागणार आहे, सबब, सदर शुल्काची मागणी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे करणेत आली असून उक्त शुल्क प्राप्त होताच हस्तांतरणाची प्रक्रीया पुर्ण होऊन प्रस्तुत इमारतीबाबत निधीनिकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रामटेक (जि. नागपूर) येथील पंचायत समितीच्या नवीन इमारत बांधकामास मंजूरी देण्याबाबत

**(४) ३८३५४ (०१-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि. नागपूर) येथील पंचायत समितीचे कामकाज हे जीर्ण झालेल्या इमारतीतून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, भिंतीला तडे गेले असून पावसाळ्यात इमारतीमधून ठिकठिकाणी पाणी पाझरत असल्याने नवीन इमारत बांधकाम मंजूर करण्याकरिता शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने नवीन इमारत बांधकाम मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी पंचायत समिती, रामटेक (जि. नागपूर) येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## आदिवासींच्या परंपरा व रुढी माहिती आणि त्यांचे संरक्षण व जतन करण्याची पद्धत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याबाबत

**(५) ३९४८५ (०९-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेसा कायदा, १९९६ च्या अनुच्छेद ४ (क) नुसार आदिवासींचा रुढीगत कायदा, सामाजिक व धार्मिक प्रथा,तंट्यावर निर्णय देण्याची रुढी पद्धत आणि त्यांचे संरक्षण यांचे प्रशासनविषयी कायदा करण्याचा राज्य शासनास अधिकार आहे काय, हे खरे आहेत काय,
(२) असल्यास,राज्य शासनाने ग्रामपंचायतीचे उपबंध (पेसा),नियम २०१४ मध्ये रुढी, प्रथा, परपंरा व त्यांचे संरक्षण या विषयी काय पद्धत असावी याची तरतूद केलेली नसून त्याचे दस्तऐवजीकरण केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासींच्या परंपरा व रुढी माहिती आणि त्यांचे संरक्षण व जतन करण्याची पद्धत निश्चित करण्यासाठी कायदा करण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०८-०९-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोरोना काळात प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रसिध्दीसाठी जिल्हा परिषदेने लावलेल्या वाहन चालकांना भाडे न दिल्याबाबत

**(६) ४०७६६ (०१-०४-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा परिषदेने कोरोनाकाळात प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रचार प्रसिध्दीसाठी खाजगी वाहने भाड्याने घेवून गावागावात प्रसिध्दी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रसिध्दीवर कोणत्या योजनेतून किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, प्रसिध्दीसाठी नेमलेल्या वाहन चालकांचे संपूर्ण भाडे अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रसिध्दीसाठी नेमलेल्या वाहन चालकांचे संपूर्ण भाडे अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सार्वजनिक आरोग्य विभागाने कोरोना काळात प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रचार प्रसिध्दीसाठी आरोग्य विभागाचे उपलब्ध वाहन गावागावात प्रसिध्दी करिता वापरले आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चोपडा (जि.जळगाव) पंचायत समितीच्या सन २०१७-१८ मधील रक्कम रुपये ४१,६४१/- बँकेत भरणा केली नसल्याबाबत

**(७) ४१६४९ (०१-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगाव) पंचायत समितीच्या सन २०१७-१८ यांचे नमुना नंबर ४ रोखवही मधील रक्कम रु.४१,६४१/- बँकेत भरणा करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित रोखपाल यांना रोख रक्कमेबाबत अनियमितता करण्यास वाव मिळाल्याने संबंधिताने उक्त रक्कमेचा अपहार केल्याचे निरिक्षण नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) होय,

सदर प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करुन विभागीय चौकशी करण्यात आली. विभागीय चौकशीअंती संबंधित कर्मचाऱ्यास मूळ वेतनावर आणणे ही गंभीर शिक्षा केलेली असून प्रकरणातील सर्व रक्कम रु.४१६४१/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत लावण्यात आलेल्या आरओ प्लॉन्टना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) ४३७४० (०१-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत लावण्यात आलेले आरओ प्लॉन्ट निधीअभावी बंद पडले असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आरओ प्लॉन्टची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर आरओ प्लॉन्टसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) चंद्रपूर जिल्ह्यात वेगवेगळ्या निधीतून ४६४ आर.ओ. प्लँट बसविण्यात आलेले आहेत. यापैकी ३४२ आर.ओ. सुरु असून ग्राम पंचायतीच्या देखभाल दुरुस्ती अभावी १२२ आर.ओ. प्लँट बंद स्थितीत आहेत व ते स्वनिधीतून दुरुस्त करण्याच्या सुचना जिल्हा परिषदेकडून संबंधित ग्राम पंचायतीस देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सतमाने (ता.साक्री, जि.धुळे) येथील बुराई नदीवरील पुल बांधण्याबाबत**

**(९) ४४७४३ (०७-१०-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सतमाने (ता.साक्री, जि.धुळे) या गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावरील बुराई नदीवरील तळफरशी पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने गत २ वर्षापासून या गावांचा पावसाळयात मुख्य रस्त्याचा संपर्क तुटत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे चिरणे ते अलाणे या दोन्ही गावांचे अंतर केवळ ५०० मीटर असून याठिकाणी बुराई नदीवर पुल नसल्यामुळे ग्रामस्थांना मोठा वळसा घेवून जिल्हयाच्या ठिकाणी जावे लागते तसेच,मौजे दोंडाईचा पासून ते विखरण, कामपूर, मेथी, सोनशेलू, हतनूर, भडणे, चिमठाणे, यासह जवळपास ४० गावांना एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी अलाणे येथील बुराई नदीवर तातडीने पुल बांधण्याची मागणी सातत्याने लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या वतीने शासनाकडे अनेकदा करून देखील अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदरहू ठिकाणी पुल नसल्याने कोटयावधी रुपये खर्च करुन शासनाने पुलाचे काम सोडून इतर रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून पूर्ण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी तयार केलेला रस्ता निरर्थक असून सदर पुल तातडीन बांधण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१),(२), व (३) होय,अंशतः खरे आहे.
(४) उक्त नमुद दोन्ही रस्त्यावरील बुराई नदीवर नवीन पुल बांधण्याची आवश्यकता आहे.ADB अर्थसहाय्यीत योजनेतून MISSING BRIDGE या संकल्पनेत या पूलांच्या प्राथम्यक्रमानूसार समावेश करण्यात येईल.तसेच सतमाने गावाजवळील पूलास रु.६००.०० लक्ष व अलाणे गावाजवळील पूलास रु.८००.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. निधी निकष व प्राथम्यक्रमानुसार सदर पुलांचे काम करण्याचे नियोजन राहील. तथापि या रस्त्यांवरील वाहतूक पावसाळ्यात खंडीत होत असली तरी नागरीकांना पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत.
(५) निरंक

---

## धुळे जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री योजनेतून ४ वर्षांमध्ये फक्त १० ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी देण्यात आल्याबाबत

**(१०) ४४७८३ (०९-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री योजनेतून ४ वर्षांमध्ये फक्त १० ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जिल्ह्यातील ११५ ग्रामपंचायतींची कार्यालये अद्यापही भाडेतत्वावरील इमारतीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर योजनेतून जास्तीत जास्त ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी निधी मंजूर करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१), (२) व (३) अशंत: खरे आहे,
धुळे जिल्ह्यातील मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत २९ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामांना मंजुरी देण्यात आलेली असून जिल्हा परिषदेच्या निधी मागणीनुसार निधी वितरीत केला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील खेड, दापोली,मंडणगड तालुक्यातील जिल्हापरिषद बांधकाम, विभागातील उपअभियंत्यांकडे वाहन व्यवस्था नसल्याबाबत

**(११) ४५५२२ (०७-१०-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड, दापोली,मंडणगड तालुक्यातील जिल्हापरिषद बांधकाम, जिल्हापरिषद पाणी पुरवठा विभागातील उपअभियत्यांना वाहन व्यवस्था नसल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उपअभियंत्यांकडे वाहन व्यवस्था नसल्यामुळे विकास कामांची पाहणी करण्याकरिता कामाच्या ठिकाणी जाण्याकरिता वेळेचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने उक्त विभागातील अधिकाऱ्यांना वाहन व्यवस्था तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडील ४ टक्के सादील मधून भाडे तत्वावर वाहने घेणेची कार्यवाही सुरु आहे.

---

## अमरावती जिल्हयातील रस्त्यांच्या योजनेतील कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत

**(१२) ४६६६५ (०९-१०-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अतिदुर्गम गावांना मुख्यालयाशी जोडण्याकरिता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत रस्त्याचे काम केले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्हयातील मेळघाटातील चिखलदरा आणि धारणी तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यालय नसल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे रस्त्याचे बांधकाम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील ठिकाणी या योजनेचे कार्यालय सुरु करुन या योजनेतील रस्त्यांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भभवत नाही.

---

## बाभुळगाव (जि.यवतमाळ) येथील देवगाव ते मिटनापुर रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(१३) ४७६९८ (१०-११-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) परिसरातील झपाटखेडा, देवगाव ते मिटनापूर रस्त्याचे काम मुख्यमंत्री सडक योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेले काम सहा महिन्यांचा कालावधी होऊनही कंत्राटदाराने काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे दिनांक ७ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कत्रांटदाराने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याने अपघातात दोन व्यक्ती मुत्यृमुखी पडले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त प्रकरणामध्ये दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) अंशत : खरे आहे.
(२) व (३ ) हे,खरे नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी व सिंदेवाही पंचायत समितीच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(१४) ५०४१४ (२०-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी व सिंदेवाही पंचायत समितीची इमारत फारच जुनी झाली असून कामकाजाच्या दृष्टीने अयोग्य असल्याने या दोन्ही नवीन इमारतीच्या बांधकामास निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळून सुध्दा ग्रामविकास विभाग मंत्रालय, मुंबई या विभागाकडून अद्यापही बांधकाम निधी मिळालेला नसल्यामुळे नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही इमारत बांधकामाचे निविदा प्रक्रिया करणे व इमारतीचे बांधकाम करणे या कामासाठी निधी देण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने दोन्ही इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) ग्राम विकास विभागाच्या दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, पंचायत समिती, सिंदेवाही (जि. चंद्रपूर) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.१२३६.४२ लक्ष व पंचायत समिती, ब्रह्मपूरी (जि. चंद्रपूर) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.१२४५.१९ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून यांसदर्भात निधीनिकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

**मुक्ताईनगर जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांच्या पद भरतीमुळे शिक्षणाची होत असलेली गैरसोय**

**(१५) ५१४३५ (२०-०१-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांच्या कमतरतेमुळे ग्रामीण भागात शिक्षणाची मोठया प्रमाणात गैरसाय होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांची भरती करुन शिक्षणाची होणारी गैरसाय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद स्व उत्पन्नातून (जि.प. सेस) गुणवत्ता विकास कार्यक्रम अंतर्गत जळगाव जिल्हा परिषदेच्या प्राथमिक / उच्च प्राथमिक शिक्षकांची पदे रिक्त असल्याने जि.प.शाळांमध्ये तासिका तत्वावर रु.५०००/- मासिक कमाल मर्यादेत, १०९ मराठी माध्यम व १०९ उर्दु माध्यम शिक्षण स्वयंसेवकाच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये मुक्ताईनगर तालुक्यामध्ये जि.प.मराठी शाळेमध्ये १३ व जि.प.उर्दु शाळामध्ये ०३ स्वयंसेवकाची नेमणूक करण्याबाबत नियोजन करण्यात आलेले असून त्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लाखडी माळेगाव कन्नड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) या गावाला रस्त्याचे बांधकाम करणेबाबत**

**(१६) ५३९२१ (२०-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखडी माळेगाव (ता. कन्नड, जि.औरंगाबाद) येथील ग्रामस्थांना रस्त्याअभावी मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागत असून पावसाळयात ४ महिने या गावाचा संपर्क तुटत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याअभावी या गावातील विद्यार्थी, रुग्ण यांची गैरसोय होत असल्याने निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने उक्त गावास रस्त्या करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१),(२) व (३) प्रस्तुत रस्त्यास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूरी प्रदान करण्यात आली असून माहे डिसेंबर, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निवासस्थानाच्या नियमबाह्य खर्च वसूल करणेबाबत**

**(१७) ५४०६५ (२१-०१-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे शासकीय निवासस्थानावर २०१४ ते २०२२ या कालावधीमध्ये कार्यरत असलेल्या प्रत्येक मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांच्या कार्यकाळात आत्तापर्यंत दुरुस्ती नुतनीकरण यासह सर्वच बाबींवर अद्यापपर्यंत किती रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे याची माहिती प्रत्येक मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यकाळानुसार स्वतंत्रपणे देतील काय,
(२) असल्यास, सदरचा दुरुस्तीचा खर्च करण्यासाठी राज्य शासन, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता तसेच नूतनीकरण अथवा बांधकामासाठी सक्षम कार्यालयाकडून अथवा जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेकडून परवानगी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परवानगी घेतली होती, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांच्या निवासस्थानाच्या इमारतीच्या बांधकाम किमतीपेक्षा अधिक खर्च दुरुस्तीसाठी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरचा खर्च नियमबाह्य आणि चुकीच्या पद्धतीने केला असल्यास जिल्हा परिषद पुणे यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय असल्यास राज्य शासन चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करणार, नसल्यास काय कारणे आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे शासकीय निवासस्थनावर सन २०१४ ते २०२२ या कालावधीत रु.७४.६५ लक्ष इतका निधी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन खर्च करण्यात आला आहे.
(३) नाही,
(४) व (५) हे खरे नाही. यास्त्व, कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी व निवृत्ती वेतन व सुधारित आकृतीबंध मंजूरी देऊन अंमलबजावणी करण्याबाबत

**(१८) ५४१८७ (२१-०१-२०२३). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७९२० ग्राम पंचायतीमध्ये काम करीत असलेल्या सुमारे ६००० ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांचा वेतन श्रेणी व निवृत्ती वेतन व सुधारित आकृतीबंध मंजूर करणेचा प्रश्न मागील २४ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, ग्राम पंचायत कर्मचारी हा जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याप्रमाणे पाणी शुध्दीकरण, विज पुरवठा, गटारे, सफाई, पथदिवे ग्राम पंचायत कर वसुलीचे काम तसेच केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजना तसेच कोरोना (कोविड-१९) ची कामे व त्या संबंधीची माहिती गाव पातळीवर घरादारा पर्यंत तसेच वरिष्ठा पर्यंत पोहचविण्याचे काम अल्प वेतनात नियमित करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समिती प्रमाणे वेतन, ग्राम पंचायत कर्मचा-यांना निवृत्ती वेतन लागू करणे, ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधात सुधारणा करणेबाबत शासनाकडे मंजूरी घेऊन अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने राज्यातील ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी व निवृत्ती वेतन श्रेणी व सुधारित आकृतीबंधास मंजूरी देऊन अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०९-२०२३) :** (१) नाही , हे खरे नाही.

उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.३ जुलै, १९९० च्या अधिसूचनेनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम ६१ नुसार ग्रामपंचायतींना आपली कर्तव्ये योग्यरीतीने पार पाडण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी नेमण्याचे व त्यांचे वेतन ग्रामनिधीतून देण्याचे अधिकार आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम ६१ नुसार ग्रामपंचायतींना आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी नेमण्याचे व त्यांचे वेतन ठरविण्याचे अधिकार आहेत. सन २००० मध्ये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील पंचायत समिती स्तरावरील देखभाल व दुरुस्ती खाते (R&M) सुरु करणेबाबत

**(१९) ५४८८४ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हातील पंचायत समिती स्तरावरील (R&M) देखभाल दुरुस्ती खाते बंद करुन संपुर्ण रक्कम RTGS द्वारे जिल्हा परिषद स्तरावरील R&M देखभाल दुरुस्ती खात्यात वर्ग करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी गटविकास अधिकारी यांना कळविलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती स्तरावरील (R&M) देखभाल दुरुस्ती खाते बंद केल्यामुळे हातपंप दुरुस्ती, वाहनाचे डिझेल खरेदी देयक, पंचायत समिती स्तरावर व उप अभियंता यांत्रिकी यांचेकडून डिझेल देयक अंदाजपत्रकीय तरतूद नसल्यामुळे अदा केले जात नसल्याने मोठ्या अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समिती स्तरावर R&M देखभाल दुरुस्ती खाते चालू केल्यावर ग्रामपंचायतीकडील हातपंप वर्गणी वसुली करुन सदरील खात्यात भरणा करुन पंचायत समिती स्तरावर हातपंप दुरुस्तीचे, वाहनाचे डिझेल खरेदी देयक, पंचायत समिती स्तरावर अदाई करुन हातपंप दुरुस्तीचे वाहन चालु राहुन ग्रामीण भागातील हातपंप दुरुस्तीचे काम करणे सोईस्कर होणार असल्याने पंचायत समिती स्तरावरील (R&M) देखभाल दुरुस्ती खाते पूर्ववत सुरु ठेवण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड. यांच्याकडे दिनांक १९/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुसार उक्त निवदेनाच्या पंचायत समिती स्तरावरील (R&M) देखभाल खाते सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
जिल्हा परिषदेने वाहनाचे डिझेल खरेदी देयक जिल्हा स्तरावर सादर करणेबाबत पंचायत समित्यांना कळविले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या मान्यतेने बंद करण्यात आलेले पंचायत समिती स्तरावरील देखभाल दुरुस्ती खाते नव्याने उघडण्यात येवून पूर्ववत चालू ठेवणेबाबत गटविकास, पंचायत समिती यांना वित्त विभाग, जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र क्र.जा.क्र.विवि/रोखपाल/कावि/१००१/२०२३, दि. १९/०६/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे परवानगी देण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदरील देखभाल दुरुस्ती खाते पूर्ववत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर बुटीबोरी एम.आई.डी.सी. परिसरात मोरारजी टेक्सटाईल कंपनीच्या कामगारांच्या मागण्याबाबत**

**(२०) ५५०२० (२१-०१-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर बुटीबोरी एम.आई.डी.सी. परिसरात मोरारजी टेक्सटाईल कंपनीच्या कामगारांनी विविध मागण्यांसाठी गांधी जयंतीचे औचित्य साधून किरिमिटी परिसरातील वेणा नदी पात्रात आंदोलन केल्याचे माहे नोव्हेंबर २०२२, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामगारांच्या मागण्यांसंबधी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०१-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मे.मोरारजी टेक्सटाईल प्रा.लि., एम.आय.डी.सी., बुटीबोरी, नागपूर ही आस्थापना १९९५ पासून कार्यरत असून सदर आस्थापनेत कॉटन कापडाचे उत्पादन घेण्यात येते. सदर आस्थापनेत ४८२ नियमित कामगार, १३४४ कंत्राटी कामगार व ३५० कार्यालयीन कर्मचारी असे एकूण २१७६ कामगार/कर्मचारी कार्यरत आहेत. सदर आस्थापनेतील कामगारांनी दि.२६/०९/२०२२ रोजी अपर कामगार आयुक्त, नागपूर यांना वेतन वाढ, बोनस व इतर सेवाशर्ती याबाबत निवेदन दिले होते व कामगारांच्या समस्या निवारणासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून दि.०२/१०/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता नागपूर येथे जलसमाधी आंदोलन करणार असल्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने अपर कामगार आयुक्त, नागपूर यांच्या समोर दि.२९/०९/२०२२ व दि.३०/०९/२०२२ रोजी तसेच जिल्हाधिकारी, नागपूर व उपविभागीय अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांच्यासमोर दि.०१/१०/२०२२ रोजी उभयपक्षांची बैठक आयोजित करण्यात आली. तथापि, संघटना आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने व तोडगा निघू न शकल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उप विभागीय अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांनी दि.०२/१०/२०२२ रोजी आंदोलन स्थळी कलम १४४ लागू केले होते.

तद्नंतर दि.०३/१०/२०२२ रोजी सदर आस्थापनेतील ४० ते ५० कामगार जलसमाधी आंदोलन करण्यासाठी नियोजित स्थळी उपस्थित झाले होते. त्यावेळी घटनास्थळी सहायक कामगार आयुक्त, नागपूर, पोलीस उप अधीक्षक, नागपूर व नायब तहसीलदार यांचे प्रतिनिधी यांनी व्यवस्थापन प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधी यांची बैठक आयोजित करून समोपचाराने चर्चा करून तोडगा काढण्याकरीता प्रयत्न केले. तथापि, कोणताही तोडगा निघू शकला नाही. सदरहू दिवशी कोणतीही अनुचित घटना घडलेली नाही.

अपर कामगार आयुक्त, नागपूर कार्यालयामार्फत सदर आस्थापनेस दि.१३/१०/२०२२ रोजी भेट देवून विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे पारीत करण्यात आले व सदर आस्थापनेविरूद्ध किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६, कंत्राटी कामगार अधिनियम, १९७०, बोनस प्रदान अधिनियम, १९६५ अंतर्गत मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, हिंगणा न्यायालयात खटले दाखल करण्यात आले असून सदर खटले न्यायप्रविष्ठ आहेत.

तसेच सन २०१९ ते २०२२ या कालावधीतील वेतन वाढ व इतर सेवाशर्तीबाबत उभयपक्षात बैठका घेऊन तडजोड न झाल्याने महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ अंतर्गत औद्योगिक विवाद असफल झाल्याने दि.१८/१०/२०२२ रोजी सदरहू विवाद मा.औद्योगिक न्यायालय, नागपूर यांचेकडे अभिनिर्णयार्थ संदर्भित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**नांदेड जिल्ह्यात टँकरद्वारे केलेल्या पाणीपुरवठ्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२१) ५५६७२ (२१-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात टँकरद्वारे केलेल्या पाणीपुरवठ्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची लातूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य लेखा वित्त अधिकारी यांच्या मार्फत पंचायत समितीनिहाय १३ पथके नेमूणक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पथकांनी खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची सखोल चौकशी करून अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालानुसार शासनाने कोणत्या स्वरूपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०७-२०२३) :** (१),(२) व(३) होय, यासंदर्भात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

(४) सदर अहवाल तपासून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील दारिद्रय रेषेचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(२२) ५७२२५ (२७-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात औद्योगिक विकास होत असताना ग्रामीण भागातील ३१ टक्के म्हणजे जवळपास एक तृतीयांश भागातील नागरिक अद्यापही दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात मोठ मोठे उद्योग, मासेमारी, भाजीपाला, फळ लागवड, वाढते पर्यटन असे अनेक पर्याय असतानाही सर्व सामान्य नागरिकांना उत्पन्न साधणांच्या असमानतेमुळे आपल्या किमान गरजा भागवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रायगड जिल्हयातील दारिद्रय रेषेचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हयातील विकासाला चालना देण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) रायगड जिल्हात एकूण ८०९ ग्राम पंचायती आहेत. रायगड जिल्हयात पनवेल, खालापूर, रोहा, महाड या तालुक्यात औदयोगिक क्षेत्र असून इतर तालुक्यात काही प्रमाणात औदयोगिक कारखाने तसेच उरण तालुक्यात J.N.P.T बंदर असून सदर ठिकाणी कामाची उपलब्धता होत असते.

रायगड जिल्ह्यात ०९ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक क्षेत्रे असून ०३ शासकिय सहकारी औद्योगिक वसाहती आहेत. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अधिनियम २००६ अन्वये रायगड जिल्ह्यातील एकुण ९१३१४ उत्पादन व सेवा उद्योगांनी नोंदणी केली असून यातील एकुण रोजगार संख्या ४८२२१८ इतकी आहे.

राज्य शासनाच्या उत्पादन/सेवा उद्योग व्यवसायांकरीता सुधारीत बीज भांडवल कर्ज योजने अंतर्गत सन २०१९ ते २०२३ या आर्थिक वर्षात बँकेने एकुण ४८ प्रकरणे मंजूर केली असून त्यांत रु.१७२.४२ लाख इतकी प्रकल्प किंमत समाविष्ट आहे व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजने अंतर्गत ०५ कर्ज प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले असून त्यांत रु. १०.५० लाख इतकी प्रकल्प रक्कम समाविष्ट आहे.

जिल्हयातील गरीब व गरजू महिलाचे बचत गट स्थापन करून त्यांना शासनाच्या विविध योजनाचे लाभ देवून आर्थिक सक्षम बनवण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच रायगड जिल्हातील १५ तालुक्या अंतर्गत १८२१२ स्वयंसहाय्यता बचत गटच्या माध्यमातून कुटूंबाना योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्राम पंचायत स्तरावर सन २०२२-२३ मध्ये ३६३७८२ इतके मनुष्यदिवस निर्मिती झालेली आहे. त्यामुळे रायगड जिल्हयातील दारिद्रय रेषेचे प्रमाण कमी करण्यास मदत होत आहे.
तसेच, रायगड जिल्ह्यात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, सुधारी बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना अंतर्गत एकुण २८१ प्रकरणात बँकेकडून मंजूरी मिळालेली असून त्यात रु १६६५.५० लाख इतकी प्रकल्प किंमत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) खांडपे-सांडशी रस्त्याच्या प्रलंबित कामाबाबत

**(२३) ५७३६० (२७-०४-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेले खांडपे-सांडशी रस्त्याचे काम कंत्राटदाराने अर्धवट सोडल्यामुळे नागरिकांना तसेच वाहनचालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत तीन वर्षा पासून रस्त्याचे काम होत नसल्याने वर्षाच्या पहिल्याच दिवशी ग्रामस्थांनी उपोषण करण्याचा शासनाला इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
(३) पाऊस व शेतकरी यांच्या जागेच्या अडचणीमूळे एकूण ३.५ कि.मी.पैकी ०.८ कि.मी.लांबीचे काम प्रलंबीत आहे. सदर रस्त्याची गुणवत्ता तपासणी राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या मार्फ़त करण्यात आली आहे.सदर काम हे समाधानकारक असल्याचे त्यांनी प्रमाणीत केले आहे.तथापि सदर काम माहे जुन २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजीत आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मंडणगड तालुक्यातील ( जि.रत्नागिरी ) वडवली आतले तोंडली रस्ता,**
**ग्रा.मा १०२ मध्ये भारजा नदीवर पुल बांधण्याबाबत**

**(२४) ५८०१० (२४-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) वडवली आतले तोंडली रस्ता, ग्रा.मा १०२ मध्ये भारजा नदीवर पुल बांधण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच भारजा नदीवर पुल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सातत्याने मागणी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भारजा नदीवर पुल बांधण्याबाबत विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त पुलास निधी मिळणेबाबत व पुलाचे बांधकाम त्वरीत होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) अशी बाब आढळून येत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाली (ता.सुधागड जि.रायगड) येथील पंचायत समिती कार्यालयाची इमारत**
**अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याबाबत**

**(२५) ५८६५६ (०३-०५-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली (ता.सुधागड जि.रायगड) येथील पंचायत समिती कार्यालयाची इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरत्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हयातील पाली-खोपोली मार्गालगतच पाली पंचायत समितीचे मुख्य कार्यालय असून पंचायत समितीच्या इमारतीत असलेल्या अनेक ठिकाणच्या विभागातील कार्यालयाच्या भितींना तडे, भिंतीवरील निखडलेले प्लास्टर तसेच स्लॅबही कोसळून खाली पडल्याने त्यातील सळया दिसत आहेत अशा प्रकारे इमारतीची अत्यंत वाईट दुरावस्था झाल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अनेकदा तक्रारी करुनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने कार्यालयातील स्लॅब कोसळून एखादी मोठी दुर्घटना झाल्यास याला जबाबदार कोण, असा प्रश्न तेथील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकाऱ्यांनी केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू कार्यालयात विविध प्रकारच्या कामासाठी येणाऱ्या नागरिकांची जिवीतहानी टाळण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाची झालेली दुरावस्था हा चिंतेचा विषय असून "लवकरच पंचायत समिती सेस फंडमधून निधी

उपलब्ध करुन दुरुस्ती अथवा इमारतीचे नव्याने बांधकाम करणार आहोत," असे गटविकास अधिकारी, पाली यांनी सांगितल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणी इमारतीची पाहणी करण्यात आली आहे काय, पाहणी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त कार्यालयाची इमारत त्वरीत बांधण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) सन २०२२-२३ या वर्षामध्ये पंचायत समितीच्या सेस (४ इमारत व दळणवळण) या लेखाशिर्षामधून पंचायत समिती, पाली (जि. रायगड) येथील प्रशासकीय इमारतीच्या दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती, महागांव व उमरखेड (जि.यवतमाळ) येथील नविन पंचायत समितीच्या इमारतींच्या बांधकामास निधी मंजूर करणेबाबत**

**(२६) ५९३४२ (०२-०५-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागांव व उमरखेड पंचायत समिती, (जि.यवतमाळ) येथील नविन पंचायत समितींच्या इमारतींच्या बांधकामास निधी मंजूर करणेकरिता जिल्हा परिषदेच्या नियमानुसार वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश दिनांक १४.११.२०२२ रोजी वा सुमारास अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशानुसार सदरील अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालानुसार या योजनेस मान्यता देण्यात आली आहे काय, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) पंचायत समिती महागांव व उमरखेड, (जि.यवतमाळ) येथील नविन पंचायत समितींच्या इमारतींच्या बांधकामाचे परिपूर्ण प्रस्ताव शासनास अप्राप्त आहेत. सबब, प्रस्तुत इमारतींचे परीपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यास निधी, निकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्हयातील तीन पुल व जवळपास ३० कि.मी. रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२७) ५९८११ (०२-०५-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्हयातील तीन पुल व जवळपास ३० कि.मी रस्त्यांची कामे अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर रस्त्यांची कामे तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय,हे अंशतः खरे आहे.
(२) नांदुरा-खामगांव शहरास पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी यामुळे पुलाचे काम अडथळा व वनविभाग़ाच्या परवानग़ीस विलंब झाल्यामुळे ३ रस्त्यांच्या कामांस विलंब झाला आहे.
(३) नांदुरा व खामगांव नगरपरीषद यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येत आहे.तसेच प्रस्तुत कामे माहे डिसेंबर २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## सुरगाणा तालुका (जि. नाशिक) येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०२०-२१ मध्ये मंजूर रस्ता सुधारणा व देखभाल व दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२८) ६०३०२ (२७-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरगाणा तालुका (जि. नाशिक) येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मंजूर इजिमा ८२ ते रगतविहीर रस्ता सुधारणा व देखभाल दुरुस्तीचे काम अद्याप मक्तेदार एजन्सीकडून पूर्ण करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या कामाचे कार्यारंभ आदेश मक्तेदार एजन्सीला सन २०२१ रोजीच देण्यात आले असून देखील काम अपूर्ण स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त काम पूर्ण न करताच संबंधित मक्तेदार एजन्सीकडून बिलाचे देयक देखील काढण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## ब्रम्हपूरी व सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत

**(२९) ६०३६३ (०२-०५-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रम्हपूरी व सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडून प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली असून या दोन्ही कामांच्या अंदाजपत्रकाचे प्रस्ताव प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे गेल्या अनेक महिन्यापासून प्रंलबित आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही कामांच्या अंदाजपत्रकास अंतिम मंजूरी देण्याची प्रक्रिया ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे सुरु असतानाच सदरहू कामास स्थगिती देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त कामांना देण्यात आलेली स्थगिती उठवून सदरहू दोन्ही पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) ग्राम विकास विभागाच्या दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, पंचायत समिती, सिंदेवाही (जि. चंद्रपूर) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.१२३६.४२ लक्ष व पंचायत समिती, ब्रह्मपूरी (जि. चंद्रपूर) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.१२४५.१९ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

यास्तव, प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या बैठकीतील निर्देशानुसार ग्राम विकास विभागाच्या दिनांक १८ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना दिनांक १९ जुलै, २०२२ व दिनांक २५ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत इमारत बांधकामावरील दिलेली स्थगिती उठविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

---

## परभणी जिल्हयात प्रशासकीय राजमुळे ग्रामविकास ठप्प झाले असल्याबाबत

**(३०) ६०४४४ (०२-०५-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या गेल्या १०/११ महिन्यापासून निवडणूका झाल्या नसल्याने या स्थानिक स्वराज्य संस्थावर प्रशासक नेमण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणामुळे नागरिकांचे प्रश्न, ग्रामीण विकासाचे सर्व मुद्दे मागे पडले असून अधिकारी-कर्मचाऱ्यांवरही कोणता अंकूश राहिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त संस्थांच्या निवडणूका तातडीने घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये विविध योजना राबवून उद्दिष्टांनुसार साध्य पूर्तता केली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच नागरिकांचे प्रश्न, ग्रामीण विकासाचे मुद्दे यानुषंगाने योग्य कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद (जि.बीड) येथील केज विधानसभा मतदारसंघ, जि. बीड. मधील लेखाशिर्ष २५१५-१२३८ योजनेच्या कामांना निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(३१) ६११५२ (२७-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद, यांनी केज विधानसभा मतदारसंघ (जि. बीड) मधील लेखाशिर्ष २५१५-१२३८ अंतर्गत सन - २०२०-२१ या आर्थिक वर्षात मंजूर कामांना रु.८३६.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देणेबाबतची मागणी कार्यासन अधिकारी (यो-६), ग्रामविकास विभाग, मुंबई. यांचेकडे केली आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी त्वरित उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री व सचिव, ग्रामविकास यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदनुसार सदर कामांना किती रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला वा देण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) लेखाशिर्ष २५१५ १२३८ अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेली कामे पुर्ण झाल्यानंतर निधी मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत ग्रामविकास विभाग, शासन पत्र क्र. विकास-२०२१/प्र.क्र.१२/यो-६, दि.३१.०१.२०२२ अन्वये सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहे. प्रश्नात नमूद रु. ८३६.०० लक्ष निधी मागणीचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी विहित नमून्यात सादर केला नसल्याने शासन पत्र क्रमांक: विकास-२०२३/प्र.क्र.२६७/यो-६, दि. २१.०४.२०२३ अन्वये विहित विवरणपत्रामध्ये सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर कार्यालयाने ३६ कामांच्या देयकांचा विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर केल्यानंतर संबंधित कामांबद्दल निधी वितरीत केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड मतदार संघात (जि.बीड) मा. मुख्यमंत्री ग्रामसडक कामांच्या निविदा प्रक्रियेत आर्थिक अपहार झाल्याबाबत**

**(३२) ६११७७ (०४-०५-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड मतदारसंघात (जि.बीड) मा.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०२१-२२ या वर्षात सीएच.२/३६० एमडीआर २८ ते गाजी पूर रस्त्यावरील पूल (ता.शिरुर कासार) व बीईई-एएडबी-बीआर ०४ व सीएच.०२/२१०, पिंपळवाडी ते भाळवणी (बिंदुसार नदी वरील पूल) (ता.जि.बीड) या कामांना शासनाने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही कामांच्या निविदा मागविण्यात येवून त्यासाठी ४ निविदाकारांनी सहभाग नोंदविला असून सदर निविदांची छानणी केली असता, निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता झाली असल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदे प्रक्रियेतील अनियमिततेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ सप्टेंबर,७ ऑक्टोबर, २०२२ ते ३ जानेवारी, २०२३ या कालावधीत सचिव, ग्रामविकास विभाग (ग्रामसडक योजना, बांधकाम भवन) मुंबई यांना तसेच मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांना वारंवार पत्र, निवेदने देऊन माहिती मागविण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना म.ग्रा.र.वि.संस्था यांनी सदर प्रकरणी अनियमितता झाली नसल्याचे शासनाने कळविले असून सदरहू उत्तर चुकीच्या माहितीवर आधारीत असल्याने यामध्ये करोडो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असून संबंधित शासकीय अधिकारी व कंत्राटदार कंपनीला शासन पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने त्रयस्त समिती नेमून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) प्रस्तुत निविदा प्रक्रियेत कोणतीही अनियमितता झालेली नाही.

(३), (४) व (५) मा.लोकप्रतिनिधीनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी वरीष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्यास्तरावरून चौकशी करण्यात आली असुन त्यानुसार निविदा प्रक्रियेत कोणतीही अनियमितता नसल्याचे नमुद केले आहे.

(६) निरंक

---

**धगाव (ता.मिरज जि. सांगली) येथे शाळेजवळील परिसरात कचऱ्याच्या धुरामुळे प्रदुषण होऊन विद्यार्थी व ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(३३) ६१५४१ (११-०५-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुधगाव (ता.मिरज, जि.सांगली) येथे मध्यवर्ती भागातील महादेव मंदिराच्या मागील बाजूच्या खाणीत असलेल्या खाजगी प्राथमिक शाळेच्या शेजारी गावातील जमा हाणारा दररोज दोन टन कचरा टाकण्यात येत असून त्यातून निघणाऱ्या धुरामुळे ४५० विद्यार्थ्यांचे व ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक प्रशासनाचे संपूर्णत: दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुंषगाने सदर प्रदुषणावर आळा घालण्याकरीता गावातील कचरा संकलनाकरीता स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०९-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरेगाव (जि.सातारा) मतदार संघातील मतदार यादया चुकीच्या प्रसिध्द करण्यात आल्याबाबत**

**(३४) ६१७१५ (१०-०५-२०२३). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विधानसभा निवडणूकाकरिता असलेली मतदार यादी ही ग्रामपंचायतीने वापरणे गरजेचे असतांना कोरेगांव मतदार संघातील खेड ग्रामपंचायतीमध्ये मंडळ अधिकारी, तहसिलदार, प्रांत यांच्या चुकीच्या गैरव्यवहारामुळे मतदार याद्या चुकीच्या प्रसिध्द करण्यात येणे व मतदार याद्या तयार करण्याचे (डेटा एन्ट्री) कंत्राट एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या संस्थेला देण्यात आल्यामुळे पाटखळ ग्रामपंचायतीमध्ये ठराविक ग्रुपला फायदा होईल अशाप्रकारे चुकीची वॉर्ड रचना करणे, यासंदर्भात निवडणूक आयुक्ताकडे तक्रार केली असता सदर निवडणूक स्थगित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई केली नसल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, यांना दिनांक ७ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले असून जिल्हाधिकारी, सातारा यांना चौकशीचे निदेश देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) होय, अशंत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांचेमार्फत चौकशी चालु असून चौकशीचा अहवाल अदयाप अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून कोरेगांव विधानसभा मतदार संघातील निढळ-भोरमळा- शिंदेवस्ती या रस्ता नादुरस्त झाल्याबाबत**

**(३५) ६१७२० (०२-०५-२०२३). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून कोरेगांव विधानसभा मतदार संघातील निढळ-भोरमळा-शिंदेवस्ती रस्ता या रस्त्यांचे काम सन २०२१ रोजीच्या सुमारास पूर्ण होऊन पहिल्याच पावसात उक्त रस्ता अत्यंत नादुरुत झाल्याप्रकरणी ओंकार कंन्स्ट्रक्शन कंपनी, वडूज या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीची चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबधित कंत्राटदारांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्नच उद्भवत नाही

---

**अचलपूर ते धोतरखेडा( ता.परतवाडा जि.अमरावती) रस्त्याचे काम दर्जाहिन निकृष्ट झाल्याबाबत**

**(३६) ६२४२७ (०२-०५-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा तालुक्यातील (जि.अमरावती) अचलपूर ते धोतरखेडा रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्याच्या कामाकरीता ३ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती तरीही सदरील रस्त्याच्या दर्जाहिन झाल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने सदर कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) अशी बाब आढळुन येत नाही.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा नवीन आकृतीबंध तयार करणेबाबत**

**(३७) ६२७८३ (०२-०५-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत कर्मचारी यांचा सन २००० मध्ये आकृतीबंध तयार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया ग्रामपंचायतीला ६ कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त कर्मचारी नेमण्याची परवानगी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००० नंतर झालेली लोकसंख्या वाढ व सातत्याने वाढत असणारे नागरिकरण या तुलनेत अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे ग्रामपंचायतीस नागरी सुविधा पुरविण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा नवीन आकृतीबंध तयार करणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही,

ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम ६१ व ६१ (अ) (१) व (२) मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतींना कर्मचारी नेमण्याचे अधिकार असून आवश्यकतेप्रमाणे कंत्राटी किंवा सल्लागार तत्वावर कुशल मनुष्यबळाची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने करता येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी लागू करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(३८) ६२८९८ (०२-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी लागू करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी एकूण किती ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी लागू करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने निर्णयाची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

ग्रामीण भागातील ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी व तलाठी यांना बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करणे ग्रामसेवकांच्या कार्यालयात जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे नाव व पत्ता असलेले फलक लावण्याची मागणी श्री. गोंविद शंकर कामतेकर यांनी दि. १०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांना केली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदांकडून कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना शासनाच्या दि. ०५ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. ग्रामसेवकांना शासन स्तरावरुन बायोमेट्रिक हजेरी लागू करण्यात करण्यात आलेली नाही.

(२) व (३) ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्याबाबत विभागीय आयुक्तांकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्यातील सर्व ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील (जि.वर्धा) येथील जिल्हा परिषद वर्धा मार्फत केलेल्या पाणी टंचाईच्या कामाची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ६२९३१ (०३-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील (जि.वर्धा) जिल्हा परिषद वर्धा मार्फत पाणी टंचाई निवारणार्थची कामे माहे ऑक्टोंबर, २०२१ ते ३० जून २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालावधीतील पाणी कंत्राटदारामार्फत पाणी टंचाईची कामे पूर्ण करण्यात येऊनही करण्यात आलेल्या कामांची देयके कंत्राटदारांना अजूनही शासनाकडून देण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त कालावाधीतील पाणी टंचाईची प्रलंबित देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०१-०६-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.

शासनाने दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त,नागपूर यांना निधी वितरीत केला असून देयके अदा करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना हस्तांतराचे अधिकार सरपंचांना देण्याबाबत**

**(४०) ६३०९८ (०३-०५-२०२३). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलजीवन मिशनअंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण झाल्यानंतर योजना हस्तांतरीत करण्याचे सरपंचाचे अधिकार काढून घेण्याचा निर्णय नाशिक जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना हस्तांतराचे अधिकार सरपंचांना द्यावे अशी मागणी चांदवड तालुका सरपंच संघटनेतर्फे चांदवड गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(४१) ६३१४२ (०२-०५-२०२३). श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगव्हान ते लामकाणा तांडा हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत २०१६ मध्ये मंजूर होऊन तो अजून पर्यंत पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, संबंधित ठेकेदाराने याच वेळेला आपली ७ कामे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून घेतली तीही अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त बांधकाम अपूर्ण ठेवलेल्या ठेकेदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) सदरहू रस्ता एकूण ४.७५० लांबीचा आहे त्यापैकी १.७००कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम पुर्ण झालेले आहे.उर्वरीत ३.०५० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम वनविभाग़ाच्या परवानगी अप्राप्त असल्याने प्रलंबित आहे.
(३) व (४) संबधित कंत्राटदार यांना निवदा प्रक्रियेप्रमाणे ०७ कामे देण्यात आली होती.त्यापैकी ०५ कामे सद्यस्थितीत पुर्ण झालेली आहेत.उर्वरीत २ कामांच्या बाबतीत शेतक-यांचा विरोध, वनविभागाची परवानगी व न्यायलयीन प्रकरण इ. बाबींमुळे प्रलंबीत आहेत
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**नेरळ-कशेळे, (ता.कर्जत,जि.रायगड) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत भीमाशंकर राज्य मार्गावरील बोर्ले ते जिते या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) ६३१५९ (०३-०५-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ-कशेळे, (ता.कर्जत,जि.रायगड) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत भीमाशंकर राज्य मार्गावरील बोर्ले ते जिते गावापर्यंतच्या अडीच किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे सुरु असलेले काम दहा महिन्यांचा कालावधी होऊनही अद्यापही पूर्ण झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारांला काळा यादीत टाकण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय,हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रस्ता रूंदीकरणासाठी आवश्यक त्या प्रमाणात जागा उपलब्ध नसल्याने काम प्रलंबीत आहे.जागा उपलब्धतेनुसार माहे डिसेंबर २०२३ अखेर काम पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही,

---

**जोडपरळी (ता.जि.परभणी) येथील १५ वा वित्त आयोग व जलजीवन मिशनच्या कामांमध्ये झालेला भ्रष्टाचाराबाबत**

**(४३) ६३२८३ (०२-०५-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.जोडपरळी (ता.जि.परभणी) येथे ग्रामपंचायतीने १५ वा वित्त आयोग व जलजीवन मिशन अंतर्गत निकृष्ट दर्जाची कामे करुन भ्रष्टाचार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामांची चौकशी व्हावी यासाठी एका संघटनेने दिनांक २५/१/२०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, परभणी यांना निवेदन देऊन उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त कामांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) १५ वा वित्त आयोग अंतर्गत झालेल्या कामांची चौकशी करण्यात आली असून उक्त कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे आढळून आलेले नाही. परंतु अनियमितता झालेली आहे व संबंधित दोषींना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(४ ) प्रश्न उदभवत नाही.

---

### औसा जि.लातूर येथील महिला बचत गटाच्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(४४) ६३३१३ (०३-०५-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) येथे जिल्हा परिषद अंतर्गत महिला बचत गटाच्या कामकाजासाठी सन २०१२ मध्ये बांधण्यात आलेल्या इमारतीचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याचे सदर इमारतीचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०२१ व सन २०२२ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांना निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. : पणन२००८/प्र.क्र.३३/योजना-१ दि.३१.०३.२०१० अन्वये औसा ( जि.लातुर) येथे जिल्हा परिषद अंतर्गत महिला बचत गटाच्या कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधण्यासाठी रु. २५.०० लाख निधी वितरण करण्यात आला. तसेच, या विभागाच्या दि.२४.११.२०१० च्या शासन निर्णयान्वये स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या मुलभूत सुविधेतुन रु.२५.०० असे दोन्ही मिळुन रु.५०.०० लक्ष खर्च करण्याची तरतुद करण्यात आली होती.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. : पणन-२००८/प्र.क्र.७३८/योजना-१ दि. २७ फेब्रुवारी २००९ स्वयंसहाय्यता बचत गटाच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्र बाधण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर मुळ शासन निर्णयात समाविष्ट नसलेल्या तथापि तालुका विक्री केंद्रासाठी आवश्यक सोई सुविधा (पाणीपुरवठा, विद्युतीकरण व फ़र्निचर इ.) पुरविण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्याचा तसेच मुळ शासन निर्णयातील प्रती तालुका विक्री केंद्रासाठी अनुज्ञेय रु.२५.०० लक्ष इतक्या रक्कमेमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव असल्याने यापुर्वी घेण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेमध्ये वाढ झाल्यामुळे या प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता घेणे संयुक्तीक ठरेल असे अभिप्राय नियोजन तसेच वित्त विभागाने दिलेले आहेत. त्यास अनुसरुन मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्याचे विभागाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(४५) ६३३२१ (०२-०५-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील सर्व्हे नं ५४ ( १५६ अ ) हिस्सा नं ३/१ या जागेत श्री.प्रसाद दत्ताराम भोजने यांनी ग्रामपंचायत, कोळंब यांचेकडून कोणत्याही प्रकारची बिनशेती आदेश न घेता घराचे दिनांक ८/१२/२०२१ रोजी वा त्यासुमारास अनधिकृत बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी अनधिकृत एमटीडीसी चे नोंदणी प्रमाणपत्र घेऊन लॉजिंग व्यवसाय चालविण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बांधकाम तात्काळ थांबिवण्याबाबत ग्रामपंचायत, कोळंब यांनी लेखी पत्र माहे डिसेंबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये श्री. प्रसाद भोजने रा. कोळंब घर मालकांनी बांधकामाबाबत कोणत्याही प्रकारचा बिनशेती आदेश न घेता घराचे बांधकाम केलेले आहे. दिनांक २५.०५.२०२३ रोजी झालेल्या मासिक सभेत ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ५२ (४ व ५) अन्वये कार्यवाही करण्याच्या सूचना सभेने दिली आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील किमान ३०० गांवाना यंदा पाणीटंचाईची समस्यांना सामोरे जावे लागत असल्याबाबत**

**(४६) ६३३४५ (०३-०५-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील किमान ३०० गांवाना यावर्षी पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याने माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावात उन्हाळयात निर्माण होणारी पाणीटंचाई लक्षात घेता जलजीवन मिशन अंतर्गत अमरावती जिल्हयातील चिखलदरा, धारण व अन्य तालुक्यांमध्ये पाण्याच्या टाक्या, पाण्याची टाकी ते घरपर्यंत पाईपलाईन टाकणे अशी अनेक काम करण्यात आली आहेत तरीही उपाययोजना करुनही उक्त गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्यास शासनाने मदतीची पुर्णतयारी केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०१-०६-२०२३) :** (१) माहे ऑक्टोबर, २०२२ ते जून, २०२३ या कालावधीकरिता अमरावतील जिल्हयातील ग्रामीण भागातील ६१८ गांवामध्ये ८०० उपाययोजनांचा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा जिल्हा प्रशासनाकडून तयार करण्यात आला आहे.
(२) जिल्हा परिषद, अमरावती यांच्यामार्फत अमरावती जिल्हयात ग्रामीण भागामध्ये ४० लिटर पेक्षा कमी पाणी मिळत असलेल्या ६६१ गावाकरिता ५५ लिटर प्रति मागणी प्रमाणे पाणी पुरवठा करण्याकरिता जल जीवन मिशन सन २०२२-२३ अंतर्गत ६६१ गावाच्या पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून ५९२ गावांच्या योजनांचे काम प्रगतीपथावर आहेत व १३१ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. जल जीवन मिशनची कालमर्यादा २०२४ आहे. दरम्यान अमरावती ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणार्थ संबंधित गावाकरिता संभाव्य पाणी टंचाई आराखडा तयार करण्यात आलेला असून त्यानुसार उपाययोजना हाती घेण्यात येत / आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यात बनावट प्रस्तावातुन व्यायामशाळा विकास अनुदान योजनेतंर्गत एकाच वर्षात दुहेरी १४ लाखाचे अपहार झाल्याबाबत**

**(४७) ६३५४५ (२७-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयात बनावट प्रस्तावातून व्यायामशाळा विकास अनुदान योजनेतंर्गत एकाच वर्षात दुहेरी १४ लाखाचे अनुदान लाटण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात व्यायामशाळा विकास अनुदान योजनेतंर्गत व्यायामशाळा उभारणीसाठी इकरा एज्युकेशन सोसायटी, दारव्हा या संस्थेमार्फत तसेच या संस्थेअंतर्गत संचालित दारव्हा तालुक्यातील महागांव कसबा येथील नॅशनल ऊर्दु हायस्कुलच्या वतीने क्रीडांगणावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी सैय्यद निसार सैय्यद मुस्तफा यांनी सादर केलेले दोन्ही प्रस्ताव खोटे, बनावटी दस्तावेज दाखल करुन शासनाची फसवणूक केली आहे तरी याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०१९-२० या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत इकरा एज्युकेशन सोसायटी, दारव्हा या संस्थेस व्यायामशाळेच्या बांधकामासाठी व्यायामशाळा विकास अनुदान योजनेंतर्गत रु.७ लक्ष अनुदान देण्यात आलेले आहे.

तसेच, उपरोक्त संस्थेद्वारा संचालित नॅशनल उर्दु हायस्कूल, महागांव-कसबा, ता.दारव्हा, जि.यवतमाळ या शाळेस क्रीडांगणावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरीता क्रीडांगण विकास अनुदान योजनेंतर्गत रु.७ लक्ष अनुदान देण्यात आलेले आहे.

कामाच्या तपासणीमध्ये उपरोक्त बांधकाम शासकीय नियमानुसार केले नसल्याचे आढळून आल्यामुळे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक ०३.०१.२०२३ रोजी अनुदानाची रक्कम वसुल करण्याबाबत आदेश दिले आहेत. या आदेशांविरुध्द संस्थेच्या अध्यक्षांनी मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे रिट याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(४८) ६४१०३ (०३-०५-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील वाड्या-वसत्यांवरील नागरिकांना पिण्याचे शुध्द पाणी देण्यासाठी जलजिवन मिशन हाती घेतले या योजनेतून जिल्ह्याला ८५० कोटी रुपये मिळणार आहेत, मात्र या योजनेमध्ये अनियमितता झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेच्या चौकशीसाठी बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियत्यांच्या अध्यक्षेतेखाली तीन सदस्यांची समिती जिल्हा नियोजन समितीत झालेल्या चर्चेप्रमाणे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीत आपला प्राथमिक अहवाल परंतु अंतिम अहवाल अद्याप दिला नसल्याने जिल्ह्यातील जलजीवन मिशनची अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंतरिम अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर चौकशी अहवालामधील १८९ निविदा नस्त्यांपैकी १६ निविदामध्ये पात्र असतांना अपात्र केलेचे व ७६ निविदामध्ये अपात्र असतांना पात्र केलेचे आक्षेप नमुद केले आहे. अशा एकुण ९२ निविदा नस्ती वगळुन उर्वरित ९७ योजनेचे काम प्रगतीपथावर असून, त्यांचे देयक वेळोवेळी अदा करण्यात आलेले आहे.

तथापि, आक्षेपाच्या ९२ निविदा नस्त्यांचे कार्यारंभ आदेश चौकशी समिती गठीत करण्यापूर्वीच विभागाकडून निर्गमित केलेले असल्याने ९२ योजनेचे काम चौकशी समिती गठीत करण्यापूर्वीच सुरु झालेले आहेत. त्या अनुषंगाने सदरच्या ९२ कामाचे झालेल्या कामाच्या प्रमाणात देयके यापुर्वीच विभागाकडून अदा करण्यात आलेले आहे व सदरची कामे प्रगतीपथावर आहे. ९२ योजनेच्या आक्षेपाबाबत विभागाकडून आक्षेपाची पुर्तता करुन अंतिम करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) चौकशी समितीच्या अनुषंगाने कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत परभणी शहरालगतच्या वांगी ते राज्य मार्ग या रस्त्याचे काम ठेकेदाराकडून प्रलंबित असल्याबाबत

**(४९) ६४११० (०३-०५-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत परभणी शहरालगतच्या वांगी ते राज्य मार्ग या २ कि.मी. अंतराच्या रस्त्याच्या डांबरीकरण व पुलाचे काम सन २०१७-१८ मध्ये मजूंर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम संबंधित ठेकेदाराकडून संथ गतीने सुरु असून गेल्या चार वर्षापासून काम प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेने मार्च, २०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेशीत करुनही अद्याप काम पूर्ण  केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने शासनाने संबंधीत ठेकेदारावर कोणती कारवाई केली तसेच उक्त रस्त्याच्या डांबरीकरणे व पुलाचे काम त्वरीत करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) होय,हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सद्यस्थितीत रस्त्याचे काम पुर्ण झालेले असल्याने , संबंधीत ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर पंचायत समितीच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निधीत अपहार झाल्याबाबत

**(५०) ६४२४७ (०३-०५-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर पंचायत समितीच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत देण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांना ऑनलाईन पैसे ट्रान्सफर झाल्याची नोंद असते परंतु अनेकांना ते मिळत नसून पैसे न देता परस्पर पैसे लाटण्यात येत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तसेच सदरच्या अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०५-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद मधील १३४६ लाभार्थ्यांनी वैयक्तिक शौचालयासाठी अर्ज सादर केले होते. त्यापैकी ११४९ अर्जदारांनी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण केले आहे. या ११४९ लाभार्थ्यांचे Geo tagging झाल्यानंतर SBM-IMIS वर (ऑनलाईन) भौतिक तसेच आर्थिक नोंदी घेऊन या सर्व लाभार्थ्यांना तीन टप्प्यामध्ये (९० लाभार्थी, ४८२ लाभार्थी व ५७७ लाभार्थी) अनुदान अदा करण्यात आले आहे.

(२) याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी नेमलेल्या चौकशी समितीने तपासणी करून सादर केलेल्या अहवालानुसार, यात्रकरणी प्रोत्साहन अनुदानाचा गैरव्यवहार/अपहार झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.